# ठाणे महानगरपालिका ठाणे

## क्रिडा विभाग

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या वतीने क्रकेट खेळाचे खेळाडु दत्तक घेऊन पुरुष व्यावसायिक क्रिकेट संघाकरिता **संघ व्यवस्थापक** यांच्या कडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या मा महासभा ठरावानुसार क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने क्रिकेट या खेळाचे व्यावसायिक संघ तयार करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका शहरातील उद्योन्मुख क्रिडापटुंना अधिकाधिक प्रोत्साहन देण्याच्या हेतुन ठाणे महानगरपालिकेच्या वतीने पुरुष क्रिकेट व्यावसायिक संघाकरिता संघ व्यवस्थापक या पदाकरिता ११ महिन्यांच्या नेमणुकीसाठी कंत्राटी पध्दतीने खालील अटी व शर्तीस अधिन राहुन अर्ज मागविण्यात येत आहे.

अर्जदाराने खालील पात्रतेच्या अटींची पुर्तता केरणे आवश्यक आहे.

**पुढील ११ महिन्याकरीता ठोक मासिक मानधनावर करारपध्दतीने नेमण्यात येणाऱ्या व्यवस्थापकाच्या नेमणूकीच्या अटी व शर्ती :-**

अ) स्पोर्ट क्लब/संघाबरोबर व्यवस्थापक म्हणून कमीत कमी ०५ वर्षाचा अनुभव (संघ / जिल्हा / विद्यापीठ / राज्य / व्यावसायीक संघ) असणे आवश्यक आहे.

ब) रजिस्टर क्लब/संस्थेचे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत व्यक्तीबाबत असणे आवश्यक आहे. (सदरची अट बंधनकारक आहे.)

क) शासकीय किंवा निमशासकीय संघाबरोबर व्यवस्थापक पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.

**नेमण्यात येणाऱ्या व्यवस्थापकाचे कर्तव्य व महत्वाच्या सुचना खालीलप्रमाणे**

१. व्यवस्थापकाची नियुक्ती विहित नियमानुसार कंत्राटी/करार पद्धतीने प्रति महिना रु.३०,०००/- एकत्रित ठोक मानधनावर ११ महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात असेल. त्यांना सेवेत कायमस्वरूपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क रहाणार नाही.

२. व्यवस्थापकाला वेळोवेळी सरावास व स्पर्धेस उपस्थित राहून संपूर्ण नियोजन व व्यवस्थापन करणे बंधनकारक राहील.

३. जर एखादा खेळाडू गैरवर्तन करत असेल, सतत गैरहजर रहात असेल, तर व्यवस्थापकाने संबंधिताची त्या दिवसाची हजेरी पत्रकावर गैरहजरी लावावी लागेल.

४. संघ स्पर्धेकरीता बाहेरगावी जाणार असेल त्यावेळेस संघ व्यवस्थापक यांनी त्यांच्या संघाचे रेल्वे आरक्षण स्वतः जाऊन करावे. संपूर्ण प्रवास व स्पर्धेदरम्यान खेळाडूंची काळजी व जबाबदारी योग्यरित्या पार पाडावी.

५. व्यवस्थापकाने स्पर्धा सपल्यानंतर सदर स्पर्धेचा अहवाल त्वरित सादर करणे बंधनकारक आहे. सदर स्पर्धेकरीता होणाऱ्या खर्चाची पुर्व कल्पना लेखी देण्यात यावी व स्पर्धा संपल्यानंतर खर्चाच्या हिशोबाची कागदपत्रे त्वरीत सादर करावी.

६. खेळाडूस सरावा दरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास व्यवस्थापक खेळाडू सोबत उपचारा दरम्यान उपस्थित राहील.

७. जर खेळांडूकडून व्यवस्थापकाबद्दल कोणतीही तक्रार आल्यास त्यांची शहानिशा करुन त्याचा करार रद्द करण्यात येईल.
८. व्यवस्थापकाची संघाबरोबरीची वर्तणुक व सहकार्याचा आढावा घेऊन पुढील करार वाढविण्याबाबत मा. आयुक्त सो. यांचेकडे प्रस्तावित करण्यात येईल व त्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त सो. यांना असतील.
९. सदर प्रकरणी कोणताही वाद उद्भवल्यास मा. आयुक्त सो. यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवार यांनी २९/१०/२०२६ सायं, ०५.०० वाजेपर्यंत आपली व्ययक्तीक माहिती ,अनुभव व इतर प्रमाणपत्राच्या प्रमाणित छायांकित प्रतींसह, क्रिडा अधिकारी, दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह , जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड, ठाणे (प) या पत्यावर अर्ज सादर करावेत. अर्ज करताना लिफाफ्यावर अर्जदार यांनी **ठाणे महानगरपालिका पुरुष क्रिकेट संघाकरिता संघ व्यवस्थापक पदाकरिता नियुक्तीसाठी अर्ज केलेला आहे.** असे मोठ्या व ठळक अक्षरात नमुद करावे.

अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता खलीलप्रमाणे आहे.:
प्र.उप आयुक्त (क्रिडा):
दादोजी कोंडदेव क्रिडा प्रेक्षागृह
जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड,
ठाणे (प.)

ठामपा/पिआरओ/क्रिडा/४६०/२०२६-२७
दि. २७/१०/२०२६

(मिनल पालांडे)
प्र.उप आयुक्त (क्रिडा)
ठाणे महानगरपालिका ठाणे

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**क्रिडा विभाग**

**अर्जाचा नमुना**

**(पुरुष क्रिकेट संघाकरीता संघ व्यवस्थापक पदासाठी अर्जाचा नमुना)**

प्रति,
मा. आयुक्त सो,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

फोटो

१. संपूर्ण नाव :- ......................................................................
(प्रथम आडनाव)

२. संपूर्ण पत्ता :- ......................................................................
......................................................................
......................................................................
......................................................................

३. संपर्क क्रं. :- ............................Email ID .........................

४. जन्म तारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

५. आज रोजीचे वय :-

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

६. शैक्षणिक अर्हता :-

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(अ). इतर अर्हता-

...........................................
...........................................
...........................................
...........................................

७.नोकरी करीत असल्यास :-

| संस्थेचे नांव व पत्ता | कार्यरत असलेल्या पदाचे नांव | कालावधीत | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

- स्पोर्ट क्लब/संघाबरोबर व्यवस्थापक म्हणून कमीत कमी ०५ वर्षाचा अनुभव (संघ / जिल्हा / विद्यापीठ / राज्य / व्यावसायीक संघ) असणे आवश्यक आहे.
- रजिस्टर क्लब/संस्थेचे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत व्यक्तीबाबत असणे आवश्यक आहे. (सदरची अट बंधनकारक आहे.)
- शासकीय किंवा निमशासकीय संघाबरोबर व्यवस्थापक पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.

| संस्थेचे नाव | पद | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

८.अवगत असणाऱ्या भाषा :

| भाषा | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| | | | |

९. आपणास विरूध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे/ नाही? असल्यास थोडक्यात तपशील द्यावा.

..............................................................................................

..............................................................................................

१०. अर्जासोबत खालील (छायाकिंत) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१.
२.
३.
४.
५.

वर दिलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे व माझ्या समजुतीप्रमाणे पुर्णत: सत्य आहे. कोणतीही माहिती असत्य व अपुर्ण किंवा चुकीची असल्याचे आढळुन आल्यास किंवा निवडीच्या पुर्वी किंवा नंतर काही अपात्रता आढळुन आल्यास माझी उमेदवारी/नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र असेन व माझी कोणत्याही टप्प्यावर नेमणुक रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

( )

उमेदवाराचे नाव व सही